महाराष्ट्र शासन

महसुल विभाग

# उपविभागीय दंडाधिकारी, वरोरा यांच कार्यालय

ई-मेल आयडी sdo.warora@gmail.com

क्रमांक कावि/अ.का./उविदं/२०२०/८४५ दुरध्वनी क्रमांक ०७१७६-२८२०१६

दिनांक ८ /०७/२०२०

---

वाचा :- (१) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३४ (C) ३४(M)

(२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७

(३) मा.जिल्हादंडाधिकारी चंद्रपुर यांचे आदेश क्रमांक एमएजी/कार्या-८/टे-३/सांले/२०२०/६००, दिनांक १७ जुन, २०२०

(४) तहसिलदार वरोरा यांचे पत्र क्रमांक कावि/कलि/प्रस्तु-१/२०२०/६६०, दिनांक ८ जुलै, २०२०

## आदेश

ज्याअर्थी संपुर्ण महाराष्ट्रात कोरोना या विषाणुचा प्रादुर्भावात वाढ झालेली असून या विषाणुमुळे उदभवणा-या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपातकालीन परिस्थीती निर्माण झाल्याने राज्यात साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २ , ३, व ४ ची अंमलबजावणी अधिसुचनेच्या दिनांकापासून लागु करुन मा.जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी चंद्रपुर जिल्हयात सदर विषाणुचा प्रादुर्भाव झाल्यास प्रादुर्भाव रोखण्याकरीता करण्यात येणा-या विविध उपाययोजनेच्या अनुषंगाने जिल्हयातील कायदा व सुव्यवस्थेबाबत नियोजन व समन्वय, क्षेत्रीय स्तरावरील अडचणी सोडविणे, क्षेत्रीय स्तरावर आदेश देणे, वाहतूक अडचणी असल्यास क्षेत्रीय स्तरावर संबधीतांना आदेश देणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याकरीता मा.जिल्हाधिकारी चंद्रपुर यांनी उपविभागीय अधिकारी यांची **Sub Divisional Incident Commander** म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी चंद्रपुर जिल्हयात सदर विषाणुचा प्रादुर्भाव होत असल्याने रुग्ण आढळून येत आहेत त्यामुळे ज्या क्षेत्रात कोरोना बाधीत रुग्ण आढळून आला तो परिसर व सदर परिसराजवळील इतर परिसरात कोरोना विषाणुचा संसर्ग इतर नागरीकांना होऊ नये यादृष्टीने तात्काळ प्रभावाने कंन्टेनमेंट क्षेत्र (Containment Zone) निश्चीत करुन सदर परिसरातील क्षेत्राच्या सिमा बंद करणे आवश्यक असल्याने व सदर कार्यवाही ही तात्काळ प्रभावाने होणे अपेक्षीत असल्याने मा.जिल्हादंडाधिकारी चंद्रपुर यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा **Sub Divisional Incident Commander** यांना प्रतिबंधीत क्षेत्र (Containment Zone) निश्चीत करुन त्या क्षेत्राच्या सीमा तात्काळ प्रभावाने बंद करणे व प्रतिबंधीत क्षेत्रासंबधी इतर कार्यवाही करण्याकरीता संदर्भिय आदेश क्रमांक ३ अन्वये प्राधिकृत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी चंद्रपुर जिल्हयातील वरोरा तालुक्यातील **मौजा मोहबाळा भागातील** कोरोना संसर्गाचा प्रादुर्भाव शहरातील इतर भागांत होऊ नये याकरीता खालीलप्रमाणे परिघीय क्षेत्राच्या सिमा बंद करण्याची माझी खात्री झाली आहे.

Sub - Divisional Magistrate Warora

..२..

Containment Zone – **मौजा मोहबाळा ता.वरोरा जिल्हा चंद्रपुर**

- पूर्व : **श्री.देविदास पिपळशेंडे यांचे घर**
- पश्चिम : **श्री.वसंता आत्राम यांचे घर**
- उत्तर : **श्री.नितीन पिंगे यांचे घर**
- दक्षिण : **श्री.बंडू वांढरे यांचे घर**

त्याअर्थी मा.जिल्हादंडाधिकारी यांनी संदर्भिय क्रमांक ३ चे आदेशान्वये मला दिलेल्या अधिकाराचा वापर करुन वरीलप्रमाणे परिघीय क्षेत्राच्या सिमा पुढील आदेशापावेतो बंद करण्याचा आदेश देण्यात येत आहे.

सदर मनाई हुकुम आदेशाचे कालावधीत उपरोक्त क्षेत्रात पुर्वपरवानगी शिवाय कोणतेही आवागमनास परवानगी असणार नाही ही पुर्व परवानगी आवश्यक सेवा पुरविणा-या पास धारकांना लागू राहील.

चंद्रपुर जिल्हयातील वरोरा तालुक्यातील **मौजा मोहबाळा ता.वरोरा जिल्हा चंद्रपुर** च्या क्षेत्रात शासकीय कर्तव्यावर असलेले अधिकारी/कर्मचारी यांना अत्यावश्यक सेवेस्तव कर्तव्य करण्याची आवश्यकता, तातडीचे वेदयकिय कारणे तसेच अत्यंविधी, वैदयकिय सेवेशी संबधीत खाजगी डॉक्टर, नर्स, मेडीकल स्टोअर्स, दुकानदार, पॅथालॉजिस्ट, रुग्णवाहीका यांना मुभा राहील. तसेच **तहसिलदार वरोरा/गटविकास अधिकारी पं.स.वरोरा** यांचेकडून सदर प्रतिबंधीत क्षेत्रात अत्यावश्यक सेवा पुरवठाधारकांना परवाना/पासेस निर्गमित करण्यात यावे आणि सदरहु परवाना/पासेस धारकांची यादी संबधीत पोलीस स्टेशन अधिकारी यांना तात्काळ दयावी. सदरहु परवाना/पासेस धारकांना आवश्यक सेवा पोलीस स्टेशन अधिकारी यांनी नेमून दिलेल्या ठराविक वेळेत **सकाळी ०९.०० ते दुपारी ०२.००** या कालावधीत पुरविण्याची मुभा राहील. तसेच सदरहु अत्यावश्यक सेवा पुरवठा करतांना सामाजिक अंतर (**Social Distancing**) चे व इतर आरोग्य विषयक नियमांचे पालन करण्याची जबावदारी **तहसिलदार वरोरा/गटविकास अधिकारी पं.स.वरोरा** यांनी त्यांच्या अधिनस्त कर्मचारी यांचे मार्फत करावी.

जे वरील आदेशांचे उल्लघंन करतील त्यांचेवर **आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४, भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८** व इतर संबधीत कायदे व नियम यांचे अंतर्गत कार्यवाही करण्यात येईल.

(सुभाषशिंदे)
उपविभागीय दंडाधिकारी
वरोरा 8/7/2020

प्रतिलिपी- (१) मा.जिल्हादंडाधिकारी चंद्रपुर यांना माहीतीस सविनय सादर.
(२) उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरा यांना माहीतीस समादराने अग्रेषित.
(३) तहसिलदार वरोरा यांना माहीतीस व कार्यवाहीसअग्रेषित.
(४) गटविकास अधिकारी पंचायत समिती वरोरा यांना माहीतीस व कार्यवाहीस अग्रेषित.
(५) तालुका आरोग्य अधिकारी वरोरा यांना माहीतीस व कार्यवाहीस अग्रेषित.
(६) वैदयकिय अधिक्षक उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय वरोरा यांना कार्यवाहीस अग्रेषित.

Sub - Divisional Magistrate Warora

( सुभाषशिंदे )
उपविभागीय दंडाधिकारी
वरोरा